


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ८३ वा | शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# राणा सूर्यवंशी यांच्यावरील कथित हल्ला : वास्तव की बनाव ?

## नवनाथ झोळ व हर्षवर्धन झोळ यांची चौकशी करून सुटका

### भाजप नेते रामदास झोळ यांच्या दत्तकला शिक्षण संस्थेच्या वादातूनच गुंतवण्याचा प्रयत्न

### पोलीस खात्यासह सर्वत्र उलटसुलट चर्चांना उधाण; अधिकृत तपासातूनच सत्य समोर येणार !

**बारामती, पुणे (कटूसत्य वृत्त):–** उद्योगपती राणा सूर्यवंशी यांच्यावरील कथित हल्ल्याच्या घटनेने बारामती परिसरात खळबळ उडाली असून, या प्रकरणाभोवती आता उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. हा हल्ला नेमका कसा झाला की करवून घेतला त्यामागील कारण काय आणि घटनेशी संबंधित सर्व बाबींची पोलिसांकडून कितपत पडताळणी करण्यात आली, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

पुणे, बारामती पोलीसांनी राणा सूर्यवंशी यांचा मागील ४ ते ५ वर्षापासून असलेला चालक ज्ञानदेव शिंदे यांनी हल्लेखोरांना पैसे देऊन हा हल्ला घडवून आणल्याचे पोलीस तपासातून निष्पन्न झाल्याचे सांगितले आहे.

दि.१९/१०/२०२६ रोजी पोलीसांनी नवनाथ झोळ यांना त्यांच्या राहत्या घरातून अटक केल्याचे पत्र देऊन ताब्यात घेतले व हर्षवर्धन झोळ यांना कोल्हापूरातून अटक केली. अटक करताना पोलिसांनी झोळ यांना असे सांगितले की, ज्ञानदेव शिंदेनी तुमची नावे घेतलेली आहेत. तुम्ही त्या हल्लेखोरांना पैसे देताना राणा सुर्यवंशी यांचा चालक ज्ञानदेव शिंदेनी स्वतः पाहिले आहे, असे सांगितल्यामुळे तुम्हाला अटक करीत आहोत. मात्र पोलिसांनी ज्ञानदेव शिंदेला पोलीस खाकी दाखवल्याने व पुन्हा योग्य तपास केल्याने ज्ञानदेव शिंदेनीच हल्लेखोरांना पैसे दिल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे झोळ पिता पुत्रांची रात्रभर चौकशी करून सकाळी सोडून दिले.

त्यामुळे राणा सुर्यवंशी यांनी झोळ कुटुंबियांना खोट्या केसेसमध्ये गुंतवण्यासाठीच या हल्ल्याचा बनाव केल्याचे झोळ कुटुंबियांनी वाटते. मात्र पोलिसांनी आता त्या दिशेने निःपक्षपाती चौकशी करून दुध का दुध आणि पाणी का पाणी करावे अशी मागणी कायदा तज्ञांकडून जोर धरत आहे.

याबाबत अधिक माहिती देताना झोळ कुटुंबियांनी सांगितले की, झोळ कुटुंबियांची भिगवन परीसरात असलेली दत्तकला शिक्षण संस्था हडप करण्याच्या हेतूने व उद्देशानेच माजी विश्वस्त राणा सूर्यवंशी हा मागील काही महिन्यांपासून झोळ कुटुंबीयांना खोट्या गुन्ह्यांत अडकवून मानसिक आणि आर्थिक त्रास देत असल्याचा गंभीर आरोप करत या हल्ल्यात ही गुंतवण्याचा प्रयत्न करत असल्याचे झोळ कुटुंबियांनी सांगितले. तसेच राणा सुर्यवंशी यांनी झोळ कुटुंबियांना व त्यांच्या सहकाऱ्यांना फोन करून संपवण्याच्या व गुंतवण्याच्या दिलेल्या धमक्यांची तक्रार गृह विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून ते कनिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत केलेली आहे. त्या तक्रारीची पोलीसांनी दखल घेऊन राणा सुर्यवंशी यांच्या वर कारवाई करुन झोळ कुटुंबियांना योग्य ते संरक्षण द्यावे अशी हात जोडून विनंती झोळ कुटुंबियांनी केली आहे.

रामदास झोळ यांना सोडवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या त्यांच्या भावाला व पुतण्याला आणि रामदास झोळ यांना जामीन होवू नये म्हणूनच राणा सुर्यवंशी यांनीच हा हल्ला घडवून आणला आहे का असा प्रश्न करमाळा व भिगवन तालुक्यातील नागरिकांकडून विचारला जात आहे. हल्ल्याची सत्यता, त्यामागील पार्श्वभूमी आणि विविध व्यक्तींच्या भूमिकेबाबत अधिकृत तपासातूनच वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे.

#### झोळ पिता-पुत्रांची चौकशी; पुढे काय ?

दरम्यान, दत्तकला शिक्षण समूहाचे सर्वेसर्वा तथा भाजप नेते रामदास झोळ यांचे बंधू नवनाथ झोळ व पुतण्या हर्षवर्धन झोळ यांना बारामती पोलिसांनी चौकशीनंतर सोडले म्हणजे संबंधित व्यक्तींना क्लीन चिट मिळाली, असे आपोआप म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे केवळ चौकशी झाली म्हणून त्यांच्यावर संशय घेऊन आरोप करणेही योग्य नाही. कायद्याच्या चौकटीत राहून प्रत्येक बाबीची पडताळणी करणे आणि पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष काढणे, हीच तपासाची योग्य दिशा ठरू शकते.





#### पोलीस खात्यातील चर्चांपेक्षा अधिकृत खुलासा महत्त्वाचा !

या प्रकरणाबाबत पोलीस खात्यासह विविध स्तरांवर उलटसुलट चर्चा सुरू असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या चर्चांना अधिकृत पुष्टी नसल्यास त्यांना अंतिम सत्य मानता येणार नाही. प्रकरणातील संभ्रम दूर करण्यासाठी पोलिसांनी तपासाच्या दृष्टीने कायदेशीर मर्यादेत उपलब्ध माहिती स्पष्ट करणे महत्त्वाचे आहे. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शींचे जबाब, वैद्यकीय अहवाल, तांत्रिक पुरावे आणि आवश्यक असल्यास कायदेशीर प्रक्रियेनुसार कॉल डिटेल रेकॉर्डची पडताळणी यांसारख्या बाबी तपासासाठी महत्त्वाच्या ठरू शकतात. या सर्व बाबींची प्रत्यक्ष पडताळणी झाली आहे की नाही, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नसल्याने कोणताही ठाम निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. या प्रकरणातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कथित हल्ल्याची घटना नेमकी कशी घडली आणि त्यासंबंधीच्या चर्चांमागे तथ्य काय आहे मात्र, हा हल्ला बनावट असल्याची चर्चा समाज माध्यम, सुजाण नागरिक व कायदा तज्ञांकडून जोरात सुरू आहे.

जर घटनेबाबत कोणतेही परस्परविरोधी दावे समोर आले असतील, तर त्यांची स्वतंत्रपणे पडताळणी करून सत्य समोर आणणे पोलिसांची जबाबदारी आहे. तसेच हल्ला प्रत्यक्ष घडला असल्यास त्यामागील सूत्रधार आणि संबंधित आरोपींचा शोध घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

#### हल्ल्याच्या घटनेभोवती प्रश्नांचे वलय !

उद्योगपती राणा सूर्यवंशी यांच्यावर सत्तूरने वार करण्यात आल्याची घटना घडली. विशेष म्हणजे, सूर्यवंशी यांना राज्य शासनाकडून स्टेनगनधारी ५ ते १० पोलीस संरक्षण असतानाही एक दोघे जण सत्तूरने हल्ला करु शकतील? आणि ते हल्लेखोर पळून जावू शकतील का? हल्लेखोर सापडण्या अगोदर झोळ पिता पुत्रांना पोलीसांनी ताब्यात घेऊन चौकशी का केली? झोळ पिता पुत्रांची चौकशी सुर्यवंशी यांच्या सांगण्यावरूनच केली का ? हल्लेखोरांनी तीच हल्ल्याची जागा का निवडली ? हल्लेखोर सुर्यवंशी यांच्या किती दिवसांपासून पाळतीवर होते. राणा सुर्यवंशी व त्यांचा चालक ज्ञानदेव शिंदे याच्यात कधी आणि किती वेळा कशा कशा वरुन वाद झाले होते का? राणा सुर्यवंशी यांनी त्यांचे चालक ज्ञानदेव शिंदे याला कामावरून काढून टाकले आहे का? कामावरून काढले असेल तर कधी व कश्या वरुन काढले. अशा एक नाही अनेक प्रश्नांची चौकशी होणे आवश्यक आहे. या यांत्रिक युगात पोलीसांनी हल्लेखोरांचे, शिंदेचे, सुर्यवंशी व झोळ कुटुंबियांचे फोन कॉल रेकॉर्डची तपासणी करून सेटालाईट द्वारे लोकेशन तपासणी केली आहे का? अतिशय महत्त्वाचं म्हणजे सुर्यवंशी यांनी झोळ कुटुंबियांना व त्यांच्या सहकाऱ्यांना फोन करून संपवण्याच्या व गुंतवण्याच्या दिलेल्या धमक्यांची पोलीस दखल घेऊन सुर्यवंशी वर कारवाई करणार का? पोलीस संरक्षणातील पोलीस या हल्ल्यात सामील असतील तर त्यांच्या वर कारवाई केली जाईल का? पोलीस संरक्षण घेऊन सर्व सामान्यांना धमकावून खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचा प्रयत्न केला म्हणून पोलीस संरक्षण काढून घेतले जाणार का? या हल्ल्याने पोलीस व सरकारची प्रतिमा मलीन झाल्याने या कटात कोण कोण सामील होते यासह सर्व प्रकारची चौकशी करण्याची मागणी सुजाण नागरिकांकडून केली जात आहे. तसेच सुर्यवंशी हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा वापर करून संस्थेवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करत असल्याचाही दावा करण्यात आला आहे.

राणा सूर्यवंशी यांच्यावरील कथित हल्ल्याची घटना, झोळ कुटुंबियांच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असल्याने तिचा तपास सर्व बाजूंनी होणे गरजेचे आहे. घटनेच्या वेळी नेमके काय घडले आणि घटनास्थळी उपलब्ध असलेले पुरावे काय सांगतात, या प्रश्नांची उत्तरे तपासातून मिळणे महत्त्वाचे आहे. घटनेबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू असल्या, तरी चर्चांना पुराव्यांचा पर्याय मानता येणार नाही. एखाद्या घटनेबाबत संशय व्यक्त होणे आणि त्या संशयाला पुष्टी देणारे पुरावे उपलब्ध असणे, यात मोठा फरक आहे. त्यामुळे कोणाच्या तरी सांगण्यावर विश्वास ठेवण्याऐवजी पोलिसांनी योग्य तो तपास करून पुरावे समोर आणणे आवश्यक आहे.

#### Y + सुरक्षा भेदली कशी ? हल्ला की सुरक्षेतील कसूर ?



राणा सूर्यवंशी यांच्यावरील कथित हल्ल्याची फिर्याद आणि समोर येणारी वस्तुस्थिती यांत विसंगती असल्याचा संशय व्यक्त होत आहे. Y+ सुरक्षा असतानाही हल्ला झाला कसा? सुरक्षा यंत्रणेकडून कर्तव्यात कसूर झाली की घटनेमागे वेगळेच वास्तव आहे? या प्रश्नांची उत्तरे केवळ निष्पक्ष आणि सखोल तपासातूनच मिळू शकतात. त्यामुळे प्रकरणाचा तपास स्वतंत्र केंद्रीय यंत्रणेकडे (CBI) सोपविण्याची मागणी होत असून, उपलब्ध पुरावे व परिस्थितीची स्वतंत्र पडताळणी होणे आवश्यक आहे. हल्ला खरा की बनाव, याचा निर्णय आरोपांवर नव्हे, तर ठोस पुराव्यांवरच व्हायला हवा!

#### निष्पक्ष तपासातूनच संशयाचे धुके दूर होणार !

राणा सूर्यवंशी यांच्यावरील कथित हल्ला प्रकरणात कोणाचाही दबाव न घेता निष्पक्ष तपास होणे आवश्यक आहे. हल्ल्याची सत्यता, घटनेमागील कारणे, उपलब्ध पुरावे आणि संबंधित व्यक्तींच्या भूमिकेबाबत स्पष्टता आली, तरच सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळू शकतो.

या प्रकरणात केवळ कोणाची चौकशी झाली आणि कोणाला सोडून दिले, एवढाच मुद्दा नाही; तर नेमके काय घडले, याचे सत्य जनतेसमोर येणे महत्त्वाचे आहे. आरोपांच्या आधारे कोणालाही दोषी ठरवणे चुकीचे; पण गंभीर घटनेबाबत अनुत्तरित प्रश्नांकडे दुर्लक्ष करणेही योग्य नाही. त्यामुळे बारामती पोलिसांच्या अधिकृत भूमिकेकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

राणा सूर्यवंशी यांच्यावरील कथित हल्ला हा बनाव होता, याचे उत्तर चर्चांमधून नव्हे, तर निष्पक्ष तपास आणि ठोस पुराव्यांतूनच मिळणार आहे. याबाबत तपास चालू असल्याचे पोलीसांनी सांगितले तर राणा सुर्यवंशी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता ते आता रुग्णालयात असल्याने त्यांची बाजू समजू शकली नाही.

# जरांगे पाटलांच्या '५०० कोटीं'च्या ऑडिओ क्लिपने खळबळ!

## एकनाथ शिंदेंना थेट सवाल; श्रीकांत शिंदेंच्या माध्यमातून पैसे पोहोचल्याचा कथित दावा चर्चेत

### शिवसेनेची फ्लेक्सबाजी करत जरांगेंना प्रत्युत्तर

**मुंबई (कटूसत्य वृत्त):–** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील शाब्दिक संघर्ष आता नव्या वळणावर पोहोचला आहे. जरांगे-पाटील यांनी शिंदे यांच्याबाबत केलेल्या ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहाराच्या आरोपामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. त्यातच भाजपच्या कथित कॉन्फरन्स मीटिंगमधील एक ऑडिओ क्लिप चर्चेत आली असून, या क्लिपमध्ये श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून जरांगे-पाटील यांच्यापर्यंत ५०० कोटी रुपये पोहोचल्याचा दावा केल्याचे सांगितले जात आहे.

मनोज जरांगे-पाटील यांनी बीड जिल्ह्यातील नारायणगडावरील दसरा मेळाव्यात एकनाथ शिंदे यांना थेट सवाल केला. भाजपमधील काही नेत्यांकडून आपल्याला ५०० कोटी रुपये दिल्याची चर्चा होत असल्याचा दावा करत, शिंदे यांनी भाजपच्या नेत्यांना नेमके काय सांगितले, याचा खुलासा करण्याची मागणी त्यांनी केली. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून आपल्याला पैसे पोहोचवण्यात आल्याची चर्चा कोठून सुरू झाली, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

#### ऑडिओ क्लिपमध्ये नेमकं काय ?

समोर आलेल्या कथित ऑडिओ क्लिपमध्ये हिंदी भाषेत, 'जरांगे पाटील को ऑलरेडी ५०० करोड रुपये पहुँच चुके है... श्रीकांत शिंदे के पाससे पहुँच चुके है...' असा दावा केल्याचे सांगण्यात येत आहे. त्याच संभाषणात विधानसभा निवडणुकीत जरांगे-पाटील यांचा राजकीय फायदा होईल की नाही, याबाबत आपले स्वतंत्र गणित असल्याचाही उल्लेख असल्याचे वृत्त आहे. ही क्लिप विधानसभा निवडणुकीपूर्वीच्या भाजपच्या कॉन्फरन्स मीटिंगमधील असल्याचा दावा केला जात आहे.



#### जरांगेंचा शिंदेंना थेट इशारा :

'तुम्ही मला ५०० कोटी रुपये दिले का? दिले नसतील, तर भाजपमधून अशी चर्चा का केली जात आहे?' अशा आशयाचे सवाल उपस्थित करत जरांगे-पाटील यांनी या प्रकरणाचा छडा लावल्याशिवाय शांत बसणार नसल्याचा इशारा दिला. मराठा समाजाच्या पाठिंब्याचा उल्लेख करत, आपण आवाहन केल्यास मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत जमा होऊ शकते, असेही त्यांनी म्हटले. या आरोपांमुळे शिंदे आणि जरांगे यांच्यातील संबंधांबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. काही महिन्यांपूर्वी शिंदे यांच्याबद्दल सकारात्मक भूमिका मांडणाऱ्या जरांगे-पाटील यांच्याकडून आता थेट सवाल उपस्थित होत असल्याने या संघर्षाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

#### शिंदेंचा आरोपांना स्पष्ट नकार :

मनोज जरांगे-पाटील यांच्या आरोपांवर एकनाथ शिंदे यांनी ५०० कोटी रुपये दिल्याचा किंवा घेतल्याचा आरोप फेटाळून लावला. जरांगे-पाटील यांनी कोणताही आरोप करण्यापूर्वी त्याची शहानिशा करावी, असे त्यांनी म्हटले. त्यांच्याकडे या प्रकरणासंबंधी पुरावे असतील, तर ते सादर करावेत आणि त्याची चौकशी व्हावी. त्यातून सत्य बाहेर येईल, अशी भूमिका शिंदे यांनी मांडली. शिंदे यांचा स्पष्ट नकार आणि जरांगे-पाटील यांचे सवाल यामुळे या प्रकरणातील राजकीय संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. जरांगे-पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी केली जात आहे.

# पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी सोलापूर जिल्हा प्रशासन सज्ज

## 193 मतदान केंद्रांवर आज मतदान

### 1,165 कर्मचारी नियुक्त, मतदान साहित्य घेऊन पथके रवाना

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. 23 ऑक्टोबर 2026 रोजी मतदान होणार असून, सोलापूर जिल्ह्यात निवडणूक प्रक्रिया सुरळीत, शांततेत आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी 117, तर शिक्षक मतदारसंघासाठी 76 अशी एकूण 193 मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. मतदानाची सर्व तयारी पूर्ण झाली असून, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि कर्मचारी आवश्यक साहित्य घेऊन आपापल्या केंद्रांकडे रवाना झाले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिली.




जिल्ह्यातील दोन्ही मतदारसंघांतील मतदान प्रक्रिया व्यवस्थित पार पडावी, यासाठी मनुष्यबळ, मतदान साहित्य, वाहतूक, सुरक्षा, मतपेट्या आणि मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे. निवडणूक कामकाजासाठी संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या असून, विविध स्तरांवर समन्वय ठेवण्यात येत आहे.



#### मतदान साहित्याचे वाटप; पथके केंद्रांकडे रवाना

निवडणुकीच्या तयारीचा भाग म्हणून दि. 21 ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरावरून तालुकास्तरावर आवश्यक मतदान साहित्य, जंबो बॅलेट बॉक्स आणि मतपत्रिकांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर गुरुवार, दि. 22 ऑक्टोबर रोजी तिसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले. प्रशिक्षणानंतर तालुकास्तरावरून मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि कर्मचारी मतदानाचे साहित्य घेऊन संबंधित मतदान केंद्रांकडे रवाना झाले.

मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी मतदान प्रक्रियेतील जबाबदाऱ्या, साहित्याचा वापर आणि निवडणूकविषयक नियमांबाबत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. मतदान केंद्रांवर आवश्यक तयारी पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

#### पदवीधर मतदारसंघात 49 हजार 722 मतदार

जिल्हा निवडणूक कार्यालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार, सोलापूर जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी एकूण 49 हजार 722 मतदार नोंदणीकृत आहेत. यामध्ये 37 हजार 730 पुरुष आणि 11 हजार 992 महिला मतदारांचा समावेश आहे.

पदवीधर मतदारसंघासाठी माळशिरस येथे सर्वाधिक 6 हजार 517 मतदार आहेत, तर सोलापूर शहर मध्य येथे सर्वात कमी 2 हजार 256 मतदार नोंदणीकृत आहेत. मतदारसंघातील मतदारसंख्येनुसार मतदान केंद्रांचे नियोजन करण्यात आले आहे.

#### शिक्षक मतदारसंघात 15 हजार 303 मतदार

शिक्षक मतदारसंघासाठी जिल्ह्यात एकूण 15 हजार 303 मतदार आहेत. यामध्ये 10 हजार 927 पुरुष आणि 4 हजार 376 महिला मतदारांचा समावेश आहे. पदवीधर आणि शिक्षक अशा दोन्ही मतदारसंघांतील मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी संबंधित मतदान केंद्रांवर आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे.

#### 11 विधानसभा क्षेत्रांमध्ये 193 मतदान केंद्रे

सोलापूर जिल्ह्यातील विविध विधानसभा क्षेत्रांमध्ये पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांसाठी स्वतंत्र मतदान केंद्रांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार करमाळा येथे पदवीधर मतदारसंघासाठी 10 आणि शिक्षक मतदारसंघासाठी 8 मतदान केंद्रे; माढा येथे अनुक्रमे 13 आणि 9; बार्शी येथे 11 आणि 9; मोहोळ येथे 11 आणि 7 मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

सोलापूर शहर उत्तर येथे पदवीधरांसाठी 8 आणि शिक्षकांसाठी 2, तर सोलापूर शहर मध्य येथे अनुक्रमे 4 आणि 1 मतदान केंद्र आहे. अक्कलकोट येथे 10 आणि 10, दक्षिण सोलापूर येथे 10 आणि 6, पंढरपूर येथे 15 आणि 9, सांगोला येथे 12 आणि 9, तर माळशिरस येथे 13 आणि 6 मतदान केंद्रांचे नियोजन करण्यात आले आहे. या केंद्रांद्वारे जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

#### 1,165 कर्मचारी नियुक्त; सहा भरारी पथकांद्वारे देखरेख

निवडणूक कामकाजासाठी पदवीधर मतदारसंघाकरिता 705, तर शिक्षक मतदारसंघाकरिता 460 असे एकूण 1 हजार 165 कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि राखीव कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी कायदा व सुव्यवस्था, मनुष्यबळ व्यवस्थापन, मतदान साहित्य, वाहतूक आणि संगणकीकरण या कामांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी भरारी पथकांमार्फत देखरेख ठेवण्यात येत आहे.

(पान 2 वर..)

# सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या साखर पोत्यांचे पूजन उत्साहात

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळीनगर (ता.माळशिरस) येथील दि सासवड माळी शुगर फॅक्टरीने चालू गळीत हंगामात उत्पादित केलेल्या पहिल्या पाच साखर पोत्यांचे पूजन मंगळवारी दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर कारखान्याचे चेअरमन मोहनराव लांडे यांचे शुभहस्ते विधिवत पूजा करून उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमास कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर गणेश इनामके, व्हा.चेअरमन विशाल जाधव, संचालक राहुल गिरमे, सभासद सुरेश राऊत, अनिल झगडे, नरेंद्र गिरमे, माळीनगर पत्रकार संघाचे अध्यक्ष रितेश पांढरे, सचिव गोपाळ लावंड व सदस्य, वर्क्स मॅनेजर सुरेश जगताप,जनसंपर्क अधिकारी अनिल बनकर,चीफ केमिस्ट संतोष पांढरे, शेतकी अधिकारी रोहित जावळे,केन डेव्हलपमेंट ऑफिसर विराज कुदळे,नवाज शेख,काटा इन्चार्ज दत्तात्रय शिंदे, इडीपी मॅनेजर भरत साळुंखे, सुरक्षा अधिकारी भीमराव कांबळे,प्रदीप घाडगे आदी कर्मचारी उपस्थित होते.



यावेळी पत्रकारांशी बोलताना कारखान्याचे चेअरमन मोहनराव लांडे व मॅनेजिंग डायरेक्टर गणेश इनामके यांनी कारखान्याच्या चालू गळीत हंगामातील नियोजनाबाबत माहिती दिली ते म्हणाले, कारखान्यातील कामगारांना दिवाळीपूर्वी १० टक्के बोनस आणि तालुक्यातील व आसपासचे इतर साखर कारखाने जो ऊस दर देतील त्या बरोबरीनेच सासवड माळी साखर कारखाना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना निश्चितच चांगला दर देईल,अशी ग्वाही त्यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

कारखान्याने यंदाच्या गळीत हंगामासाठी चार लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले असून ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांना वेळेवर ऊस बिलाचे पेमेंट केले जाईल. सासवड माळी साखर कारखान्याच्या काट्यामध्ये असलेली अचूकता या बाबींमुळे कारखान्यावरील शेतकऱ्यांचा विश्वास कायम असल्याचे श्री.लांडे व श्री. इनामके यांनी सांगितले.चालू हंगामासाठी आवश्यक नियोजन वेळेत पूर्ण करण्यात आले असून कारखानदारीसमोर आर्थिक व अन्य अडचणी असतानाही शेतकऱ्यांचा विश्वास आणि कामगारांची उत्तम साथ यामुळे यंदाचा गळीत हंगाम यशस्वीपणे पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### साखर कारखानदारीसमोरील आर्थिक अडचणींकडे लक्ष देण्याची गरज

सध्या निर्माण झालेली कोरड्या दुष्काळाची परिस्थिती आणि साखर कारखानदारीसमोरील आर्थिक अडचणी यामुळे कारखान्यांच्या कामकाजावर परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.शासनाच्या नियमानुसार साखर कारखान्यांना विविध नियम, अटी, कर आणि एफआरपीची पूर्तता करावी लागते.मात्र या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी खाजगी साखर कारखान्यांना आवश्यक असलेला निधी बँकांच्या माध्यमातून सहकारी साखर कारखान्यांप्रमाणे कमी व्याजदराने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने ठोस धोरण आखण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.साखर कारखानदारीबाबत शासनाकडून केवळ तोंडी कौतुक केले जाते. प्रत्यक्ष आर्थिक मदत आणि धोरणात्मक निर्णयांच्या बाबतीत मात्र कारखानदारी उपेक्षित राहते. अशी खंत त्यांनी व्यक्त केली. शासनाने साखर विक्रीसाठी निश्चित केलेले दर आणि व्यापारी बाजारातील दर यामध्ये एक वाक्यता आणून साखर विक्रीचे धोरण बदलण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### सरकारी कर्जाचे धोरण ७ टक्क्यांपर्यंत ठेवण्याची मागणी

राज्यातील अनेक साखर कारखाने निधीअभावी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अशा परिस्थितीत शासनाने सरकारी कर्जाबाबतचे धोरण ७ टक्क्यांपर्यंत ठेवल्यास राज्यातील खासगी साखर कारखान्यांना आर्थिक आधार मिळेल आणि अनेक कारखाने सुरळीतपणे सुरू राहण्यास मदत होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.शेतकऱ्यांचे हित, कामगारांचे सहकार्य आणि कारखान्याची आर्थिक स्थिरता यांचा समतोल राखत चालू गळीत हंगाम यशस्वी करण्याचा निर्धार कारखाना व्यवस्थापनाने व्यक्त केला.

# गरिबीवर मात करत ऋतुजाची गगन भरारी

## ऋतुजा पारसेची डॉक्टर होण्याच्या दिशेने वाटचाल

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** जिद्द, चिकाटी, अथक परिश्रम आणि आई-वडिलांचे मोलाचे मार्गदर्शन यांच्या बळावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करत कुमारी ऋतुजा रामचंद्र पारसे हिने वैद्यकीय शिक्षणासाठीची महत्त्वपूर्ण झेप घेतली आहे. राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा NEET (UG) च्या माध्यमातून तिची सिंधुदुर्ग येथील एस. एस. पी. एम. मेडिकल कॉलेजमध्ये (SSPM Medical College) एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. तिच्या या यशामुळे तांदुळवाडी पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ऋतुजाचा शैक्षणिक प्रवास हा केवळ यशाची कहाणी नसून जिद्द, सातत्य आणि स्वप्नपूर्तीसाठी घेतलेल्या कष्टांचा प्रेरणादायी आदर्श आहे. तिचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चव्हाणवस्ती, तोंडले येथे झाले. त्यानंतर तिने हनुमान हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, तांदुळवाडी येथे माध्यमिक शिक्षण घेतले. पाचवीनंतर तिची केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालयासाठी पोखरापूर येथे निवड झाली होती. पुढे तिने संत तुकाराम इंटरनॅशनल स्कूल, लातूर येथे उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले.



शालेय शिक्षणापासूनच ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या ऋतुजाने वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. हे स्वप्न साकार करण्यासाठी तिने सातत्याने अभ्यास, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर वाटचाल केली. अखेर एनटीए (NTA) मार्फत घेण्यात आलेल्या NEET (UG) परीक्षेत मिळवलेल्या यशाच्या बळावर तिने एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवला आणि आपल्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने पहिले महत्त्वाचे पाऊल टाकले.

ऋतुजाच्या या यशामागे तिच्या आई-वडिलांचे मोलाचे योगदान आहे. प्रतिकूल आर्थिक परिस्थिती असतानाही त्यांनी तिच्या शिक्षणाला प्राधान्य दिले, तिला प्रोत्साहन दिले आणि तिच्या स्वप्नांना बळ दिले. त्याचबरोबर प्राथमिक शाळेपासून ते उच्च माध्यमिक शिक्षणापर्यंत मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचाही तिच्या यशात महत्त्वाचा वाटा आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचा विश्वास आणि स्वतःची मेहनत यांचा सुंदर संगम ऋतुजाच्या यशातून दिसून येतो.

सामान्य परिस्थितीतून असामान्य यशाकडे वाटचाल करणाऱ्या ऋतुजाने आपल्या कर्तृत्वाने परिसरातील विद्यार्थ्यांसमोर प्रेरणादायी उदाहरण उभे केले आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी मनात ध्येय निश्चित असेल आणि त्यासाठी प्रामाणिक प्रयत्नांची जोड असेल, तर यशाचा मार्ग नक्कीच खुला होतो, हे तिने सिद्ध करून दाखवले आहे.

तिच्या या यशाबद्दल तांदुळवाडी पंचक्रोशीतील नागरिक, शिक्षक, नातेवाईक, मित्रपरिवार आणि हितचिंतकांकडून तिचे अभिनंदन होत आहे. भविष्यात वैद्यकीय क्षेत्रात उच्च भरारी घेत रुग्णसेवेच्या माध्यमातून समाजासाठी मोलाचे योगदान द्यावे आणि आपल्या कर्तृत्वाने आई-वडिलांचे स्वप्न साकार करावे, अशा सदिच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

ऋतुजाच्या यशाने तिच्या कुटुंबाचा अभिमान उंचावला असून, तिचा हा प्रवास अनेक होतकरू विद्यार्थ्यांसाठी नवी उमेद आणि प्रेरणा देणारा ठरत आहे.

# विशेष मोहीम 6.0 अंतर्गत सोलापूर विभागातील 58 स्थानकांवर 'रेल जनसंवाद' उपक्रमाद्वारे प्रवाशांशी थेट संवाद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर विभाग, मध्य रेल्वे यांच्यावतीने दिनांक 22 ऑक्टोबर 2026 रोजी विशेष मोहीम 6.0 अंतर्गत विभागातील 58 रेल्वे स्थानकांवर 'रेल जनसंवाद' उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश प्रवाशांशी थेट संवाद साधणे, रेल्वे सेवांबाबत त्यांच्या सूचना, अभिप्राय आणि तक्रारी जाणून घेणे तसेच प्रवासी सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी लोकसहभाग वाढविणे हा होता.



भारतीय रेल्वेच्या देशभरातील 7,000 हून अधिक स्थानकांवर हा उपक्रम एकाच वेळी आयोजित करण्यात आला. प्रवाशांना केंद्रस्थानी ठेवून सेवा देण्याची आणि सहभागी प्रशासनाला प्रोत्साहन देण्याची भारतीय रेल्वेची बांधिलकी या उपक्रमातून अधोरेखित झाली.

सोलापूर विभागात या उपक्रमाचे नेतृत्व विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM) यांनी पंढरपूर स्थानकाहून केले. यावेळी पंढरपूर रेल्वे स्थानक येथे शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रेल्वे सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी मौल्यवान सूचना आणि अभिप्राय दिले. या संवादातुन तरुण पिढीचा सहभाग हा रेल्वे सेवांच्या सुधारणेसाठी महत्त्वपूर्ण असल्याचे स्पष्ट झाले.

सोलापूर स्थानकावर अपर विभागीय रेल्वे व्यवस्थापक (ADRM) यांनी प्रवाशांशी संवाद साधून त्यांच्या सूचना, अभिप्राय आणि प्रवासी सुविधांशी संबंधित समस्या जाणून घेतल्या. विभागातील इतर स्थानकांवरही रेल्वे अधिकाऱ्यांनी प्रवासी आणि संबंधित घटकांशी संवाद साधून त्यांना आपली मते मांडण्याची संधी दिली.

प्रवाशांकडून प्राप्त झालेल्या सूचनांवर आणि तक्रारींवर नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्यासाठी अभिप्राय फॉर्म भरून घेण्यात आले. प्राप्त मुद्द्यांचे पुढील तीन श्रेणींमध्ये वर्गीकरण करण्यात आले:

» अल्पकालीनः तातडीने किंवा कमी कालावधीत सोडवता येणाऱ्या समस्या.
» मध्यमकालीनः संबंधित विभागांमधील समन्वय, नियोजन आणि अंमलबजावणी आवश्यक असलेले विषय.
» * दीर्घकालीनः धोरणात्मक बदल, व्यापक नियोजन किंवा वरिष्ठ स्तरावरील मंजुरी आवश्यक असलेले विषय.

या पद्धतशीर प्रक्रियेमुळे प्रवाशांच्या समस्यांना प्राधान्य देणे, संबंधित विभागांमार्फत योग्य कार्यवाही करणे आणि तक्रारींचे वेळेत निराकरण करण्यास मदत होणार आहे. तसेच रेल्वे सेवा आणि प्रवासी सुविधांच्या गुणवत्तेत सातत्याने सुधारणा करण्यास चालना मिळणार आहे.

'रेल जनसंवाद' हा उपक्रम विशेष मोहीम 6.0 च्या उद्दिष्टांनाही पूरक ठरला. या मोहिमेत जागेचे प्रभावी व्यवस्थापन, भंगार व ई-कचऱ्याची विल्हेवाट, नागरिकांचा सहभाग आणि त्यानंतर स्वच्छता उपक्रम राबविणे यावर भर देण्यात येत आहे. नागरिकांच्या सक्रिय सहभागातून स्वच्छ, सुव्यवस्थित आणि प्रवाशांसाठी अधिक सोयीस्कर रेल्वे परिसर निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

सोलापूर विभागातील 'रेल जनसंवाद' उपक्रमात सहभागी झालेली 58 स्थानके पुढीलप्रमाणे आहेत:

पंढरपूर, सोलापूर, कलबुरगि, अक्कलकोट रोड, दुधनी, गाणगापूर रोड, शाहाबाद, वाडी, कुडुर्वाडी, जेऊर, धाराशिव, लातूर, बार्शी टाउन, सांगोला, हरंगुळ, होटगी, केम, मोहोळ, मरतूर, टिकेकरवाडी, सलगरे, कवठे महांकाळ, मोडनिंब, माढा, कुलाली, बोरोटी, ताज सुलतानपूर, मालीकपेठ, वाशिंबे, अनगर, औसा रोड, वाकाव, तिलाटी, भाळवणी, हिरेनंदुरू, वडशिंगे, बाळे, शेंद्री, भिगवण, जिंती रोड, मुंढेवाडी, पाकणी, केत्तूर, बबलाद, सावळगी, गौडगाव, मलठाण, येडशी, पांगरी, ढालगाव, पोफळज, अरग, ढवळस, जत रोड, ढोकी, बोरीबेल, हुन्सीहडगील आणि नागणसूर.

'रेल जनसंवाद' उपक्रमाच्या माध्यमातून सोलापूर विभागाने प्रवाशांचे म्हणणे ऐकून घेणे, त्यांच्या समस्यांवर नियोजनबद्ध कार्यवाही करणे आणि प्राप्त अभिप्रायाच्या आधारे रेल्वे सेवा व प्रवासी सुविधांचा दर्जा उंचावणे याप्रती आपली बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली आहे.

# पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर २३ ऑक्टोबर रोजी आठवडा बाजार बंद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूक-२०२६ च्या अनुषंगाने शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. मतदान प्रक्रिया निर्भय व निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच मतदान केंद्रांच्या परिसरात सार्वजनिक कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील १२ गावांमधील आठवडा बाजार भरविण्यास मनाई करण्यात आली आहे. याबाबत जिल्हादंडाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आदेश जारी केला आहे.

भारत निवडणूक आयोगाने दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्याच दिवसापासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रांच्या परिसरात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार मतदानाच्या दिवशी आठवडा बाजार भरविल्यामुळे गर्दी होऊन मतदान प्रक्रियेत अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित गावांतील बाजार बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### या गावांतील आठवडा बाजार राहणार बंद :

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप, अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी, करमाळा तालुक्यातील करमाळा, पंढरपूर तालुक्यातील चळे, तारापूर, तुगत, बाभूळगाव, शेळवे व पिराची कुरोली तसेच सांगोला तालुक्यातील जवळा, कोळा व नाझरा येथील शुक्रवारचा आठवडा बाजार दि. २३ ऑक्टोबर रोजी भरविण्यास मनाई करण्यात आली आहे.

मतदान प्रक्रिया शांततेत, सुरळीत आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी संबंधित गावांतील नागरिक, व्यापारी व विक्रेत्यांनी जिल्हा प्रशासनाच्या आदेशाचे पालन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# दिवाळी खरेदीसाठी सोलापुरात 'सखी संगम प्रदर्शन २०२६'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दिवाळी सणाच्या खरेदीसाठी सोलापूरकरांना विविध वस्तूंची आकर्षक पर्वणी अनुभवता येणार आहे. श्री सोलापूर गुजराती मित्र मंडळ संचलित महिला विभागाच्या वतीने 'सखी संगम प्रदर्शन २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन गुरुवार, २२ ऑक्टोबर आणि शुक्रवार, २३ ऑक्टोबर रोजी गुजरात भवन, मुरारजी पेठ, सोलापूर येथे सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत खुले राहणार आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या प्रदर्शनात ग्राहकांना विविध प्रकारच्या वस्तूंची खरेदी एकाच छताखाली करता येणार आहे. आकर्षक ज्वेलरी, आर्टिफिशियल ज्वेलरी, सोने-चांदीचे दागिने, ड्रेस, साड्या, ड्रेस मटेरियल, तोरण, रांगोळी साहित्य, विविध खाद्यपदार्थ, मुखवास यांसह अनेक वस्तू प्रदर्शनात उपलब्ध असणार आहेत. त्यामुळे दिवाळीच्या खरेदीसाठी ग्राहकांना विविध पर्याय मिळणार आहेत.

महिला उद्योजक आणि व्यावसायिकांना त्यांच्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, तसेच ग्राहकांना दर्जेदार आणि विविध प्रकारच्या वस्तू एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे, हा या प्रदर्शनाचा प्रमुख उद्देश आहे. सणासुदीच्या काळात खरेदीसोबतच महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्याची संधीही या प्रदर्शनातून मिळणार आहे.

सोलापूरकरांनी या प्रदर्शनाला मोठ्या संख्येने भेट देऊन दिवाळीच्या खरेदीचा आनंद घ्यावा, असे आवाहन महिला विभागाच्या अध्यक्षा प्रीती शहा यांनी केले आहे. प्रदर्शनाची माहिती महिला विभागाच्या सचिव अर्पिता बक्षी यांनी दिली.


## CHANGE IN NAME

I am changing my name from **ABHIJEET CHAVADEKAR** To **ABHIJEET RAVINDRA CHAVADEKAR** for passport issuance as per document.

**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**
**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**
**संपर्क - 9422602337, 8317212037**

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
### अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्‌या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) छ. शिवरायांवर आधारित रणजित देसाई लिखित कादंबरी २) कलर (मराठीत) ३) प्राथमिक शालेय पुस्तकांचे प्रकाशन करणारी संस्था ४) फळातील गोड द्रव ५) एक औषधी लाल रंगाचे कंदमूळ ६) बोलावण्यासाठीची आरोळी ७) धावपट्टू (इंग्रजीत) ८) भाजप नेते रावसाहेब दानवे या जिल्ह्यातील आहेत ११) पडीक जमीन १२) ग्राम, खेडे १३) लोक, रयत १५) श्रीगणेशाचे एक नाव १७) गुणाकारच्या विरूध्दार्थी शब्द १८) वत उलट लिहा २०) स्वभावाने रागीट २२) विषमच्या विरूध्दार्थी शब्द २४) रक्तवाहिनी २६) शिर्डी येथील प्रसिध्द देवस्थान २७) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष संक्षिप्तमध्ये लिहा-*** २९) डांबरी रोड ३०) फिरकी गोलंदाज-यजुवेंद्र *** ३२) उत्सवाचा दिवस ३४) धांदल, गडबड ३५) कर्ज (इंग्रजीत) ३६) भाजप नेत्या-उमा *** ३८) शर्ट ३९) ब्रेड (मराठीत) ४१) मध्य मुंबईतील एक रेल्वे स्टेशन, जिना ४२) अफूप्रमाणे एक अंमली पदार्थ ४३) झाडाचे पर्ण ४४) जय-पराजय, हार-** ४५) प्रख्यात दिवंगत गायिका-** मंगेशकर ४७) याच्यापासून शिरा बनवितात

**आडवे शब्द :** १) शिवसेनेचे महाराष्ट्रातील एक खासदार ५) लालूप्रसाद मुख्यमंत्री होते ते राज्य ९) शोध, तपास १०) सल उलट लिहा ११) लगेच, लवकर १२) फळातील मुख्य गर १३) एक म्हण-नाकापेक्षा मोती ** १४) नव्वदच्या दशकातील एक अभिनेत्री-*** टंडन १६) देवतांनी दिलेला आशिर्वाद १७) शिजवलेला तांदूळ १९) श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेशपर ग्रंथ-भगवत ** २१) आ. सुमनताई पाटील यांचा विधानसभा मतदारसंघ २३) नय उलट लिहा २५) ओंजळ २८) याचे कणीस भाजून खातात २९) सत्वयुक्त, पौष्टीक ३०) बसण्यासाठी ही अंथरतात ३१) सक उलट लिहा ३३) लहानपण ३५) संसदेचे एक सभागृह ३७) बगिचा ३८) घर, निवास ४०) इराकची राजधानी ४२) गव्हाच्या पिठापासून बनवितात ती गोल *** ४४) प्राणप्रिय मित्र, जवळचे नाते ४६) दोघांमध्ये पडलेले अंतर, भेग (हिंदीत) ४८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ४९) एक हिंदी चित्रपट-** मचाये शोर, चोऱ्या करणारा ५०) वडिलार्जित संपत्तीचा हक्कदार ५१) उन्हाळ्यातील एक महिना

## सुडोकु - 83

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | 7 | | 1 | | | 6 |
| | | | 6 | 9 | | | 1 | |
| | 9 | 6 | | 8 | | | 5 | 3 |
| 9 | 8 | 4 | | | | | | |
| 2 | | | | | | 6 | 4 | |
| 6 | | 3 | | | 5 | 8 | | |
| | 7 | 8 | | 1 | 4 | 9 | | |
| 4 | 2 | | 3 | 6 | 7 | | | 5 |
| 5 | | 1 | | | 9 | 3 | | 4 |

# आर्थिक व्यवहार्य आणि शाश्वत जलप्रकल्प उभारण्यावर भर द्यावा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** जलप्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता आणि दीर्घकालीन शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी प्रकल्पांसाठी आवश्यक जमीन, मार्गाधिकार व अन्य परवानग्या आधीच उपलब्ध असणे, तसेच वीज खर्च कमी करण्यासाठी सौरऊर्जा व बॅटरी साठवणुकीसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर करणारे ग्राहक निश्चित करून या प्रकल्पांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे गरजेचे असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूचित केले.

जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळाच्या (आयएफसी) शिष्टमंडळासोबत मुख्यमंत्री यांच्या शासकीय निवासस्थानी महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा व जलप्रकल्पांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. या बैठकीत प्रकल्पांची अंमलबजावणी, वित्तपुरवठा, तांत्रिक उपाययोजना आणि निर्धारित कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण करण्याबाबत चर्चा करण्यात आली. जागतिक बँकेच्या शिष्टमंडळात दक्षिण आशिया प्रादेशिक संचालक मारा वॉर्विक, भारतासाठी जलक्षेत्र व्यवस्थापक विल्यम रेक्स, आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळाचे (आयएफसी) दक्षिण आशिया विभागातील पायाभूत सुविधा क्षेत्राचे व्यवस्थापक नुरू लामा, तसेच हर्ष गोयल, नीरज गुप्ता, ललिता श्रीनिवास यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, की जागतिक बँकेसोबतचे सहकार्य हे केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित नसून, संस्थात्मक आणि व्यवस्थात्मक बदल घडवून आणण्याच्या दृष्टीनेही महत्वाचे आहे. आधुनिक तंत्रज्ञान, सक्षम कार्यप्रणाली आणि भविष्यातील पिढ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या व्यवस्था विकसित करण्यामध्ये जागतिक बँकेचे योगदान महत्वपूर्ण आहे. यापूर्वीही राज्याने जागतिक बँकेसोबत विविध क्षेत्रांत काम केले असून, यापुढेही हे सहकार्य अधिक व्यापक करण्याची आवश्यकता आहे.



### प्रकल्पांसाठी सर्वंकष पूर्वतयारी पूर्ण असावी

प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील विलंब टाळण्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध असणे, मार्गाधिकार निश्चित असणे आणि सर्व संबंधित परवानग्या प्राप्त झालेल्या असणे महत्वाचे आहे. अनेकदा प्रकल्प मंजूर झाल्यानंतर जमीन उपलब्ध नसल्याने किंवा अन्य अडचणींमुळे काम सुरू होण्यास एक ते दोन वर्षांचा विलंब होतो. त्यामुळे वित्तपुरवठ्यासाठी निवडण्यात येणारे प्रकल्प प्रत्यक्ष गुंतवणुकीसाठी पूर्णपणे तयार असावेत, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. लहान शहरांमध्येही अशा पायाभूत सुविधांची मोठी गरज आहे. उपलब्ध संसाधनांचा एकत्रित वापर करून आणि विविध संस्थांमध्ये समन्वय साधून प्रकल्पांची अंमलबजावणी केल्यास वित्तपुरवठ्याचा खर्च कमी करता येईल. त्यामुळे प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि दीर्घकाळ टिकणारे ठरतील, असेही त्यांनी नमूद केले.

### वीज खर्च कमी करण्यासाठी पर्यायी ऊर्जेचा वापर

जलप्रकल्पांच्या दैनंदिन संचालनामध्ये वीज खर्च हा महत्त्वाचा घटक आहे. अनेक प्रकल्पांमध्ये तांत्रिक त्रुटींमुळे नव्हे, तर वीजबिलांचा खर्च परवडत नसल्यामुळे कामकाजात अडचणी निर्माण होतात. ही बाब लक्षात घेऊन प्रकल्पांच्या नियोजनाच्या टप्प्यापासूनच त्यांच्या संचालन खचार्चा विचार करणे आवश्यक आहे. यासाठी सौरऊर्जा प्रकल्प, बॅटरी साठवणूक आणि उपलब्ध आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वीज खर्च कमी करण्यावर भर द्यावा. त्यामुळे जलप्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता वाढून त्यांची दीर्घकालीन शाश्वतता सुनिश्चित करता येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या पुनर्वापरासाठी ग्राहक निश्चित करा

सांडपाण्यावर प्रक्रिया केल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा प्रभावी पुनर्वापर करणेही तितकेच महत्वाचे आहे. प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर करणाऱ्या औद्योगिक आणि अन्य ग्राहकांची निश्चिती प्रकल्पाच्या नियोजनाचाच भाग असावा. यामुळे पाण्याची मागणी निर्माण होईल, पुनर्वापराला चालना मिळेल आणि प्रकल्पातील गुंतवणुकीचा काही भाग परत मिळविणे शक्य होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

प्रक्रिया केलेले पाणी औद्योगिक क्षेत्रे तसेच वीज निर्मिती प्रकल्पांना उपलब्ध करून देण्याबाबत यापूर्वी धोरणे करण्यात आली आहेत., या धोरणांच्या अंमलबजावणीत अद्यावत सुधारणा करुन प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर वाढविण्यासाठी आवश्यक यंत्रणा विकसित करावी, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

### प्रकल्पांना गती देऊन व्यापक स्तरावर अंमलबजावणी करण्यावर भर

बैठकीत सादर करण्यात आलेली प्रकल्पांची कालमयार्दा महत्वाकांक्षी असली, तरी योग्य नियोजन आणि समन्वयाच्या माध्यमातून ती साध्य करणे शक्य आहे. त्यामुळे सर्व संबंधित यंत्रणांनी निर्धारित कालमयार्देनुसार काम करून प्रकल्पांची लवकर अंमलबजावणी करावी. सुरुवातीला नियोजित प्रकल्प प्रभावीपणे राबवून त्यानंतर अशा प्रकल्पांचा विस्तार व्यापक स्तरावर करण्याची अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली.

या बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव नवीन सोना, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, नगरविकास सचिव के. गोविंदराज यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# शिक्षकांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष 'नैमित्तिक रजा- शिक्षणाधिकारी जगताप

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूक - २०२६ साठी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष 'नैमित्तिक रजा मंजूर करण्यात आली असल्याची माहिती माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली.



मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र दिनांक ०१ ऑक्टोबर २०२६ रोजीचे पत्रान्वये जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळांना लेखी सुचना देऊन कळविण्यात आले आहे. प्रत्येक शिक्षकांनी मतदानाचा हक्क बजावावा. मुख्याध्यापकांनी शिक्षकांना मतदानासाठी मतदानासाठी नैमित्तिक रजा मंजुर करणेत यावी.

भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक २२ सप्टेंबर २०२६ रोजीच्या कार्यक्रमानुसार विधान परिषद निवडणुक 2026 पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार दिनांक २३ ऑक्टोंबर २०२६ रोजी सकाळी ०८.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत मतदान होणार आहे.

या निवडणूकीत मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी सोलापूर जिल्हयातील आपल्या अधिनस्त प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक संलग्न सर्व व्यवस्थापना मध्ये कार्यरत असलेल्या व संबंधित मतदार संघाच्या मतदार यादीत नाव नोंदविलेल्या पात्र शिक्षक व कर्मचा- यांना मतदानासाठी आवश्यक ती सवलत देणे गरजेचे आहे.

त्यानुसार, संबंधित निवडणूकीत मतदानास पात्र असलेल्या शिक्षक व कर्मचा-यांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी नियमानुसार विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. मतदानाच्या दिवशी संबंधित पात्र मतदारांना मतदान केंद्रावर जाऊन मतदान करता येईल, याची दक्षता घ्यावी.

सदर रजेची नोंद संबंधित शाळेच्या अभिलेखात नियमानुसार घेण्यात यावी. या सूचनांची आपल्या अधिनस्त सर्व शिक्षक व कर्मचा-यांना माहिती देऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी. या बाबीस प्राधान्य देऊन आवश्यक ती कार्यवाही करणेचे सुचना शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी केल्या आहेत.

# प्रभाग २२ मध्ये किसन जाधव यांच्या नेतृत्वाखाली पदवीधर, शिक्षक मतदारांपर्यंत प्रचाराचा धडाका

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे पदवीधर आणि पुणे शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून, सोलापूर शहरातील प्रभाग क्रमांक २२ मध्ये भाजपचे नगरसेवक किसन भाऊ जाधव यांच्या नेतृत्वाखाली प्रचाराला वेग आला आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदारांशी थेट संवाद साधत भाजप-महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी जोरदार मोर्चेबांधणी केली आहे पुणे पदवीधर मतदारसंघाच्या भाजप-महायुतीच्या अधिकृत उमेदवार डॉ. स्मिता योगेश जाधव आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार कौस्तुभ मुरलीधर गावडे यांच्या प्रचारासाठी प्रभागात नियोजनबद्ध पद्धतीने जनसंपर्क मोहीम राबविण्यात येत आहे. मतदारांच्या भेटीगाठी घेऊन दोन्ही उमेदवारांची भूमिका, कार्य आणि महायुतीची विकासाभिमुख विचारधारा मतदारांपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, सोलापूर शहर मध्यचे युवा आमदार देवेंद्र कोठे आणि भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रचार मोहीम राबविण्यात येत आहे भाजप-महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले आहे. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत प्रभाग क्रमांक २२ मधील भाजप कार्यकर्ते पदवीधर आणि शिक्षक मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी सक्रिय झाले आहेत. मतदारांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, कार्यकर्त्यांची एकजूट आणि वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन यामुळे दोन्ही उमेदवारांच्या विजयासाठी अनुकूल वातावरण निर्माण होत असल्याचा विश्वास नगरसेवक किसन भाऊ जाधव यांनी व्यक्त केला. या प्रचार मोहिमेत नगरसेविका अंबिकाताई नागेश अण्णा गायकवाड, नगरसेविका चैत्रालीताई शिवराज गायकवाड, माजी नगरसेवक नागेश अण्णा गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड, राजू ब्रदर जाधव, सुनील कांबळे, युवा नेते चेतन नागेश अण्णा गायकवाड, सुहास जाधव, संतोष जाधव, अमोल सरवळे, राहुल शिंदे, अभिजीत कदम, शिरीष गायकवाड, श्रीकांत गिड्डे यांच्यासह अनेक भाजप कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. पदवीधर आणि शिक्षक मतदारांशी सातत्याने संपर्क साधत दोन्ही उमेदवारांच्या विजयासाठी प्रभाग क्रमांक २२ मधील भाजप कार्यकर्त्यांनी प्रचाराची धुरा सांभाळली असून, निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात प्रचार अधिक गतिमान झाला आहे.



# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर महापालिका ॲक्शन मोडवर

## पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर होणार दंडात्मक कारवाई

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शहरातील पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी सोलापूर महानगरपालिका प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहे. नळांना तोट्या न बसवता पाणी थेट रस्त्यावर सोडणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिला आहे. पाण्याची वाढती गरज आणि दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

सोलापूर शहरात पाण्याची बचत करणे ही काळाची गरज बनली आहे. दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना अनेक ठिकाणी नळांना तोट्या नसल्यामुळे पाणी विनाकारण वाहून जाते. त्यामुळे पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी नागरिकांनी आपल्या घरातील नळांना तातडीने तोट्या बसवून घ्याव्यात. पाणी आवश्यक तेवढेच वापरावे आणि पिण्याचे पाणी रस्त्यावर वाहून जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### पाण्याचा अपव्यय केल्यास कारवाईचा इशारा

नळांना तोट्या न लावणे किंवा पाणी थेट रस्त्यावर सोडून त्याचा अपव्यय करणे, अशा प्रकारांकडे आता महापालिका प्रशासन गांभीर्याने पाहणार आहे. पाण्याची नासाडी करणाऱ्यांविरोधात दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे नागरिकांनी महापालिकेच्या सूचनांचे पालन करून पाणी बचतीच्या मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दुष्काळाच्या संकटात पाण्याचे योग्य नियोजन आणि काटकसरीने वापर हाच महत्त्वाचा उपाय ठरू शकतो. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळून उपलब्ध पाणीसाठा जपण्यास प्राधान्य द्यावे. 'पाणी वाचवा, पाणी जपून वापरा' हा संदेश केवळ घोषणेपुरता मर्यादित न ठेवता प्रत्येकाने कृतीत उतरवावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

शहरातील पाणीपुरवठा सुरळीत राखण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून विविध उपाययोजनांवर भर दिला जात आहे. मात्र, पाणी बचतीच्या प्रयत्नांना नागरिकांचे सहकार्य मिळणेही तितकेच आवश्यक आहे. पाणीपुरवठा व्यवस्थेवर ताण येऊ नये आणि उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर व्हावा, यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने वागणे गरजेचे आहे.



# परदेशात पदव्युत्तर पदवी संपादन करून आरती बंडगर यांचे सोलापुरात आगमन

## जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले यश; विद्यार्थ्यांसाठी ठरणार प्रेरणादायी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** परदेशात उच्च शिक्षण घेऊन पदव्युत्तर पदवी संपादन केल्याबद्दल आरती बंडगर यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या यशामुळे सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या यशाचे सर्व स्तरांतून अभिनंदन केले जात आहे.

जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर आरती बंडगर यांनी मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. परदेशात उच्च शिक्षण पूर्ण करून त्या आपल्या सोलापूर शहरात परत आल्या त्यांच्या या यशाचा आनंद साजरा करण्यासाठी काल बुधवार दिनांक २१ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता आगमन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

हा सोहळा बंडगर निवास, किनारा हॉटेलच्या मागे, काडादी नगर, सोलापूर येथे पार पडला. या आनंदाच्या प्रसंगी नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार आणि हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरती बंडगर यांचे अभिनंदन केले.




# सहा हजार थकवून पाच हजारांची मदत; ही कसली दिवाळी !

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचे दोन हप्ते थकीत असताना दुष्काळी मदत म्हणून दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांचे अग्रीम देण्याची घोषणा म्हणजे शेतकऱ्यांची थट्टा असल्याची टीका होत आहे.



राज्य सरकारकडून नमो शेतकरी योजनेचे नववा आणि दहावा हप्ता अद्याप मिळालेला नाही. या दोन हप्त्यांपोटी शेतकऱ्यांना प्रत्येकी दोन हजार रुपयांप्रमाणे चार हजार रुपये मिळणे बाकी आहे. आता अकराव्या हप्त्याची वेळ जवळ आली असताना त्याबाबतही अनिश्चितता कायम आहे. त्यामुळे थकीत मदतीचे काय, असा सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत.

दरम्यान, केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २४ वा हप्ता नोव्हेंबरमध्ये जमा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. हप्ता वितरणासाठी प्रशासकीय पातळीवर पूर्वतयारी सुरू असून, लाभार्थ्यांच्या याद्या तपासणे आणि त्रुटींची पूर्तता करण्याचे काम सुरू आहे. मात्र, केंद्र सरकारने हप्ता जमा करण्याची अधिकृत तारीख जाहीर केलेली नाही. पीएम किसान योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये, तर नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत राज्य सरकारकडून अतिरिक्त सहा हजार रुपये दिले जातात. दोन्ही योजनांचे मिळून वर्षाला १२ हजार रुपये तीन समान हप्त्यांत मिळतात. नमो शेतकरी योजनेचा आठवा हप्ता २५ मार्च २०२६ रोजी जमा झाला होता.

> नमो शेतकरी योजनेचे हप्ते थकीत असताना दुष्काळी मदत म्हणून पाच हजार रुपयांचे अग्रीम जाहीर करणे म्हणजे शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार आहे. ही फसवणूक असून, शेतकऱ्यांची क्रूर थट्टा आहे.
>
> **- विजय रणदिवे,** जिल्हाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना

त्यानंतर डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ आणि एप्रिल ते जुलै २०२६ या कालावधीतील दोन हप्ते रखडले आहेत.

३, ७०० कोटींची मागणी प्रलंबित राज्यातील सुमारे ९२ लाख, तर सोलापूर जिल्ह्यातील सुमारे पाच लाख शेतकरी या योजनेचे लाभार्थी आहेत. नवव्या आणि दहाव्या हप्त्यांसाठी कृषी विभागाने राज्य सरकारकडे तीन हजार ७०० कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली आहे. पीएम किसानचा २४ वा हप्ता जमा झाल्यानंतर ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२६ या कालावधीतील नमो शेतकरी योजनेच्या अकराव्या हप्त्याची मागणी केली जाणार आहे. मात्र, आधीचे दोन हप्ते कधी मिळणार, याबाबत सरकारकडून स्पष्टता नसल्याने शेतकऱ्यांची प्रतीक्षा कायम आहे.

**शेतकऱ्यांच्या मदतीचे गणित :** पीएम किसान : वर्षाला सहा हजार रुपये. नमो शेतकरी : वर्षाला सहा हजार रुपये. थकीत हप्ते : नमो शेतकरी योजनेचे नववा व दहावा हप्ता. निधीची मागणी : तीन हजार ७०० कोटी रुपये. लाभार्थी: राज्यात सुमारे ९२ लाख; जिल्ह्यात सुमारे पाच लाख.

# एसआयआरचे काम ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावे - जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- भारत निवडणूक आयोगाच्या निदेर्शानुसार विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेअंतर्गत जिल्ह्यातील अनॅलॉमी व नो मॅपिंग मतदारांबाबतची सर्व कामे ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करावीत. यासाठी कामाची गती वाढवून कालमयार्देत उद्दिष्ट पूर्ण होईल, असे नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

भारत निवडणूक आयोगाच्या निदेर्शानुसार एसआयआरचे काम १० नोव्हेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करावयाचे असून, १६ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांकडून अनॅलॉमी व नो मॅपिंग मतदारांशी संबंधित कामे ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करून घ्यावीत, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### 'करमाळा, माढा, पंढरपूर व बाशीर्तील कामांना गती द्या'

जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे पंचनाम्यांच्या कामांना प्राधान्य देण्यात आल्याने एसआयआरची प्रक्रिया अपेक्षित गतीने सुरू नव्हती. मात्र, आता पंचनाम्यांची कामे पूर्ण झाली असल्याने मतदार यादी पुनरीक्षणाच्या कामाला गती देणे आवश्यक आहे. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांकडून प्रलंबित कामे युद्धपातळीवर पूर्ण करून घ्यावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

करमाळा, माढा, पंढरपूर आणि बार्शी विधानसभा मतदारसंघांमध्ये एसआयआरचे काम संथ गतीने सुरू असल्याचे निदर्शनास आले. या मतदारसंघांतील अधिकाऱ्यांनी पुढील दोन दिवसांत कामाचा वेग वाढवावा आणि ३१ ऑक्टोबरपूर्वी संपूर्ण काम पूर्ण होईल, अशा पद्धतीने नियोजन करावे, असेही त्यांनी सांगितले.

### विधानसभानिहाय कामाचा सविस्तर आढावा

बैठकीत जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सर्व मतदार नोंदणी अधिकारी तसेच सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून विधानसभा मतदारसंघनिहाय कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रणेचा प्रभावी वापर करावा आणि दैनंदिन कामकाजाचा नियमित आढावा घेऊन गतिमान पद्धतीने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण सुरवसे, उपजिल्हाधिकारी (महसूल) लक्ष्मण कासेकर, जिल्हा पुनर्वसन अधिकारी सुशांत बनसोडे, उपजिल्हाधिकारी सीमा होळकर, सुमित शिंदे, सदाशिव पडदुने, तहसीलदार किरण जमदाडे, निलेश पाटील, सरस्वती पाटील यांच्यासह सर्व संबंधित मतदार नोंदणी अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी प्रत्यक्ष तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# लिटल स्टार इंग्लिश मीडियम स्कूल, कुमठेचे शालेय क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश

**कुमठे (कटूसत्य वृत्त):-** शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये लिटल स्टार इंग्लिश मीडियम स्कूल, कुमठे येथील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशात भर घातली आहे. विविध क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.



या स्पर्धेत सर्वज्ञा परशुराम चव्हाण याने गोळाफेकमध्ये द्वितीय क्रमांक, आदर्श नितीन सपकाळे व अनुज नितीन सपकाळे यांनी ५ किमी चालण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक, विनायक अनिल माने याने उंच उडीमध्ये प्रथम क्रमांक, तर आरोही मिथुन राठोड हिने उंच उडीमध्ये तृतीय क्रमांक कार्तिक खासदार जाधव उंच उडी मध्ये तृतीय क्रमांक मिळवला. या खेळाडूंनी आपल्या कामगिरीने शाळेचा नावलौकिक वाढवला आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष दिलीपराव माने, संस्थेचे मुख्य विश्वस्त तथा सोलापूर महानगरपालिकेचे नगरसेवक जयकुमार माने, संस्थेच्या विश्वस्त स्वातीताई माने, शाळेच्या मुख्याध्यापिका शुभांगी पवार आणि शाळेचे समन्वयक मलकरी कोरे कुमठे प्रशालेचे मुख्याध्यापक अंबादास रेडे, कुमठे जुनिअर कॉलेज चे विभाग प्रमुख संजय जाधव यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

सोलापूर महानगरपालिका नगरसेवक संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने यांनी विद्यार्थ्यांचे सत्कार करून पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत

खेळाडूंना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक विक्रम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मेहनत, शिस्त आणि सातत्य यांच्या जोरावर हे यश संपादन केले. विद्यार्थ्यांमधील क्रीडागुणांना वाव देण्यासाठी शाळेकडून सातत्याने प्रोत्साहन दिले जात आहे.

या यशामुळे लिटल स्टार इंग्लिश मीडियम स्कूल, कुमठेच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीला नवी ऊर्जा मिळाली असून, सर्व यशस्वी खेळाडूंचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.